ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# चलनवाढ आणि आर्थिक विकास

**डॉ. विश्वनाथ गजानन कोटकर**

*अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले, ता- अकोले, जि- अहिल्यानगर 422601*

***Corresponding Author:** डॉ. विश्वनाथ गजानन कोटकर*

**DOI - 10.5281/zenodo.14875045**

***गोषवारा:***

*एखाद्या विशिष्ट कालावधीत वस्तू व सेवांच्या किंमतीत सातत्याने वाढ होणे म्हणजे किंमतवाढ होय.प्राथमिक अवस्थेतील किंमतवाढ हि अर्थव्यवस्थेला विकासाच्या मार्गावर घेऊन जाते. भारतात सन 1951 पासून चलनवाढ आणि आर्थिक विकास यांचा संबंध एकमेकांशी निगडीत राहिलेला आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात सन 2010 ते सन 2020 या काळातील चलनवाढ आणि अर्थव्यवस्था यातील विविध घटकांचा संबंध दर्शविला आहे. सन 2010 ते 2020 या काळात चलनवाढ, रोजगार, आर्थिक विकास दर, आयात, निर्यात यात घात झालेली आहे, त्याबरोबर बेकारी देखील कमी झालेली आहे.*

---

**प्रस्तावना:**

एखाद्या विशिष्ट कालावधित वस्तू व सेवांच्या किंमत पातळीत होणारी अनियंत्रित वाढ म्हणजे चलनवाढ होय. चलनवाढीमुळे वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात म्हणून चलनवाढ असे म्हणतात. चलनवाढीला किंमतवाढ, भाववाढ,मुद्रस्फिती, पैशाच्या मूल्यात घट असे अनेक पर्यायी शब्द वापरले जातात. आर्थिक परिस्थितीनुसार या शब्दांचा वापर केला जातो. चलनवाढ हे महागाई मोजण्याचे परिमाण आहे.सर्वसाधारणपणे चलनवाढीमुळे देशात रोजगारनिर्मितीची क्षमता वाढते, गुंतवणुकीत वाढ होते, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. आर्थिक विकासात वाढ होण्याची शक्यता असते.

**उद्देश:**

चलनवाढ आणि आर्थिक विकास यातील संबंध शोधणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी पूर्णपणे दुतीय स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

**चलनवाढीचा इतिहास:**

चलनवाढीला फार मोठा इतिहास आहे.जेव्हा वस्तू पैशाचा वापर होत होता तेव्हा देखील चलनवाढीची समस्या असल्याची नोंद आहे. आर्थिक परिस्थिनुसार चलनवाढ आणि चलनवाढीचा कालावधी बदलत असे. सोने, चांदी यासारख्या मैल्यवान वस्तूंच्या साहाय्याने विनिमयाचे व्यवहार होत असे. तेव्हा देखील दीर्घकाळात चलनवाढ होत असेल.

18 व्या शतकापासून अनेक देशात अपरिवर्तनीय चलनाचा वापर होऊ लागल्यामुळे पैशाच्या पुरवठ्यात मोठे बदल करणे शक्य झाले. आर्थिक संकटांचा सामना करण्यासाठी अनेक देशातील राजकारण्यांनी पैशाच्या पुरवठ्यात झपाट्याने वाढ घडवून आणली आहे.त्यामुळे उच्च चलनवाढ झालेली आहे.वस्तू पैसा अस्तित्वात होता त्यापेक्षा अधिक चलनवाढ अपरिवर्तनीय पैशाचा वापर झाल्यामुळे चलनवाढ झालेली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या 16 व्या शतकातील किंमत क्रांतीपासून ते लॅटिन अमेरिकेतील स्पॅनिश लोकांनी जप्त केलेल्या खान कामगारांकडील सोने आणि चांदीच्या पुरवठ्यातील वाढीमुळे मोठ्या प्रमाणात चलनवाढ झाली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर

हंगेरीतील आतापर्यंत जगातील सर्वात मोठी चलनवाढ झालेली आहे.

सन 1920 पर्यंत बहुतेक देशांमध्ये चलनाचा पुरवठा हा देशातील सोन्याच्या साठ्याशी निगडीत असे. सोने तारण म्हणून ठेवले जाई व त्यानुसार किंमाती स्थीर राहत असे.

त्या काळात किंमतवाढीची समस्या तीव्रतेने भासत नसे. दुसऱ्या महायुद्धानंतर पैशाच्या पुरवठ्याशी असणारा सोन्याचा संबंध सुटला. चलनवाढीमुळे रोजगारात वाढ होते,उत्पादनाला चालना मिळते, उत्पादनासाठी प्रयत्न केले जातात या विचाराने चलनवाढीचे विश्लेषण केले गेले. सन 1980 पासून स्वतंत्र मध्यवर्ती बँक असलेल्या देशांमध्ये चलनवाढ कमी आणि स्थिर आहे. यामुळे व्यावसायात स्थिरता निर्माण झालेली आहे. आर्थिक विकास निर्देशाकामध्ये देखील सातत्य आले आहे.

भारतातील चलनवाढीची कारणे,

1. तुटीचे अंदाजपत्रक.
2. रिझर्व्ह बँकेकडून चलनाची छपाई.
3. परदेशातील लोक आणि उद्योगातील नफा भारतात येणे.
4. परदेशी गुंतवणूक.
5. नकली नोटाइ.

**मापन:**

विशिष्ट मुदतीत किमतीत झालेल्या बदलाचे तौलनिक प्रमाण मोजल्यास चलनवाढ समजते. त्यासाठी मुल्यानिर्देशाकंचा वापर केला जातो. भारतात घाऊक किंमत निर्देशक (WPI) आणि ग्राहक किंमत निर्देशक (CPI) अशा दोन पद्धतीने चलनवाढ मोजली जाते.या पद्धतीने मापन करताना काही मोजक्या वस्तूंच्या किंमतीचा विचार होतो. त्यावरून सर्वसाधारण पैशाचे मूल्य शोधले जाते.याच्या काही मर्यादा देखील आहे. निर्देशांकाचा वापर करताना वस्तूच्या दर्ज्यातील फरक व्यक्तिगत खर्चाच्या पद्धतीतील फरक इ. दुर्लक्षित केले जाते.

केन्स यांच्या तत्वानुसार उपल्ध उत्पादन हे तांत्रिक ज्ञान आणि रोजगाराची पातळी यावर अवलंबून असते. अपेक्षित खर्च हा उपभोग, बचत प्रवृत्ती आणि कररचना यावर अवलंबून असते. उपलब्ध उत्पादन व अपेक्षित खर्च यामधील तफावत जेवढी असेल त्यावरून चलनवाढीची तीव्रता समजते.

**1) भारतातील चलनवाढीची स्तिती:**

चलनवाढ मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांक काढतात (CPI)

Inflation = [(CPIx+1 – CPIx/CPIx)]*100

Note: CPIx is the initial consumer price of the Index.

भारतात सन 2010 ते 2020 या कालावधीत चलनवाढीचा दर पुढीलप्रमाणे होता.

**तक्ता क्र. 1: भारतातील चलनवाढीचा दर (%)**

| वर्ष | चलनवाढीचा दर (%) |
|---|---|
| 2010 | 11.99 |
| 2011 | 8.91 |
| 2012 | 9.48 |
| 2013 | 10.02 |
| 2014 | 6.67 |
| 2015 | 4.91 |
| 2016 | 4.95 |
| 2017 | 3.33 |
| 2018 | 3.94 |
| 2019 | 3.73 |
| 2020 | 6.62 |

संदर्भ – World Bank

सरासरी सन 2010 ते सन 2020 या 11 वर्षाच्या काळात चलनवाढीचा दर 6.66 % राहिलेला आहे. सन 2010 मध्ये 11.99 असणारी चलनवाढ सन 2019 ला 3.73% पर्यंत खाली आली होती. परंतु 2020 ला पुन्हा वाढत जाताना दिसते आहे.

**2) भारतातील रोजगार:**

वैयक्तिक दृष्ट्या व्यक्तीला एखादा कामधंदा किंवा आर्थिक लाभाचा व्यवसाय मिळणे म्हणजे रोजगार होय. देशांच्या दृष्टीकोनातून सक्षम व इच्छुक लोकांना अर्थव्यवस्था किती प्रमाणात काम करण्याची संधी उपलब्ध करून देते याचे निदर्शक असणारी अवस्था म्हणजे एकूण रोजगार होय.अर्थव्यवस्थेच्या पातळीवर रोजगार इच्छुकांच्या संख्येपेक्षा रोजगार उपलब्ध कमी असेल, तर बेकारी निर्माण होते. फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जे.बी.से. म्हणतात कि जेवढे उत्पादन घेतले जाते तेवढ्या प्रमाणात जर घटकांना मोबदल्याचे वाटप केले तर, त्यांच्याकडून संपूर्ण उत्पन खर्च होईल.म्हणून अर्थव्यवस्थेत बेकारी अस्थित्वात राहणार नाही.

**तक्ता क्र. 2: भारतातील रोग्जाराचा दर (%)**

| वर्ष | रोजगाराचा दर (%) |
|---|---|
| 2010 | 53.4 |
| 2011 | 52.5 |
| 2012 | 51.6 |
| 2013 | 51.1 |
| 2014 | 50.7 |
| 2015 | 50.4 |
| 2016 | 50.0 |
| 2017 | 49.7 |
| 2018 | 49.3 |
| 2019 | 49.3 |
| 2020 | 44.00 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2020 या काळात रोजगारवाढीचा दर सातत्याने घटत जात आहे.लोकसंख्या वाढत असताना जर रोजगाराचा दर घटत असेल तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने विचारात घेण्यासारखी बाब आहे. सन 2010 ते सन 2020 या काळात रोजगाराचा सरासरी दर 50.15 % आहे.

**3) बेकारी:**

सर्वसाधारण बेकारीची व्याख्या करणे अवघड आहे. कोणत्या वयोगटातील व्यक्तीचा बेकरीत समवेश करवा? घरघुती उद्योगात विनावेतन काम करणाऱ्या कुटुंबातील सदस्यांची गणना कोठे करावी? किमान किती तास काम केल्यास रोजगार आहे असे म्हणावे? अशा अनेक अडचणी आहेत.तरी देखील बाजारात चालू असलेल्या वेतनाचा दर स्वीकारून काम करण्याची तयारी असणाऱ्या सक्षम व्यक्तीला काम मिळू शकले नाही, तर त्याची गणना बेकार म्हणून केली जाईल, आणि अशा स्थितीला बेकाराची परिस्थिती म्हणता येईल.

**तक्ता क्र. 3: भारतातील बेकारीचा दर (%)**

| वर्ष | बेकारीचा दर (%) |
|---|---|
| 2010 | 8.32 |
| 2011 | 8.22 |
| 2012 | 8.16 |
| 2013 | 8.09 |
| 2014 | 7.99 |
| 2015 | 7.89 |
| 2016 | 7.80 |
| 2017 | 7.72 |
| 2018 | 7.65 |
| 2019 | 6.51 |
| 2020 | 7.86 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2019 या काळात बेकारीचा दर 8.32% वरून 6.51% पर्यंत कमी होत गेलेला आहे. परंतु सन 2020 मध्ये पुन्हा त्यात वाढ झाली आहे. 7.86% इतका बेकारीचा दर झालेला आहे. सन 2010 ते सन 2020 या काळात बेकारीचा दर सरासरी 7.73% इतका आहे.

**4) आर्थिक विकास:**

आर्थिक विकास म्हणजे काय? याचे विश्लेषण वेगवेगळ्या अर्थतज्ञानी वेगवेगळे केलेलं आहे. सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेत लोकांच्या दरडोई उत्पन्नात सातत्याने वाढ होऊन आर्थिक कल्याण होणे म्हणजे आर्थिक विकास होय. भारतात देशाचा आर्थिक विकास मोजण्यासाठी GDP चा आधार घेतला जातो.

GDP मधील वाढ हि आर्थिक विकासाचे निर्देशक मानले जाते.

**तक्ता क्र. 4: भारताचा GDP दर (%)**

| वर्ष | DGP दर (%) |
|---|---|
| 2010 | 8.50 |
| 2011 | 5.24 |
| 2012 | 5.46 |
| 2013 | 6.39 |
| 2014 | 7.41 |
| 2015 | 8.00 |
| 2016 | 8.26 |
| 2017 | 6.80 |
| 2018 | 6.45 |
| 2019 | 3.87 |
| 2020 | -5.78 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2020 या काळात GDP चा दर सातत्याने कमी अधिक झालेला आहे. क्रमाने वाढ किंवा क्रमाने घट अशी अवस्था निर्माण झालेली नाही. सन 2010 ते सन 2020 या काळात GDP चा सरासरी दर 5.50 % राहिलेला आहे.

**5) औद्योगिक विकास:**

18 व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात अनेक उद्योगधंदे भरभराटीस आले होते. सुती व रेशीम कापड, शाली, जरीकाम या वस्तूंना जागतिक बाजारात मोठी मागणी होती. परंतु इग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर भारतातील उद्योग ऱ्हास पावले. सन 1991 ला जागतिकीकरण स्वीकारल्यामुळे पुन्हा उद्योगांनागती मिळाली.

**तक्ता कर. 5: औद्योगिक विकास दर**

| वर्ष | औद्योगिक विकास दर (%) |
|---|---|
| 2010 | 17.03 |
| 2011 | 16.14 |
| 2012 | 15.82 |
| 2013 | 15.25 |
| 2014 | 15.07 |
| 2015 | 15.58 |
| 2016 | 15.16 |
| 2017 | 15.02 |
| 2018 | 14.88 |
| 2019 | 13.46 |
| 2020 | 14.12 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2020 या काळात औद्योगिक विकासाचा दर 17.03% वरून 14.12% पर्यंत कमी होत जाताना दिसतो आहे. सन 2010 ते सन 2020 या काळात सरासरी औद्योगिक विकासाचा दर 15.23% आहे.

**6) आयात:**

भारताची लोकसंख्या आणि त्यांच्या गर्जा यामुळे सातत्याने भारताला आयात करावी लागते. सन 1991 नंतर भारताने खुली अर्थव्यवस्था स्विकारलीआहे. जगासाठी भारत एक मोठी बाजरपेठ आहे.

**तक्ता क्र. 6: भारताची आयात**

| वर्ष | भारताची आयात GDP च्या प्रमाणात (%) |
|---|---|
| 2010 | 26.85 |
| 2011 | 31.08 |
| 2012 | 31.26 |
| 2013 | 28.41 |
| 2014 | 25.95 |
| 2015 | 22.11 |
| 2016 | 20.92 |
| 2017 | 21.95 |
| 2018 | 23.69 |
| 2019 | 21.24 |
| 2020 | 19.08 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2020 या काळात भारताची GDP च्या प्रमाणात आयात कमी झालेली आहे. सन 2010 मध्ये 26.85% असणारी आयात सन 2020 मध्ये 19.08 % झालेली आहे. सन 2010 ते सन 2020 या काळात सरासरी आयात 22.71% होती.

**7) निर्यात:**

भारत स्वतंत्रपूर्वीपासून अनेकविध वस्तूंची निर्यात करत आहे. हस्तकला, चामडे, मसाले, चहा इ. आजदेखील हि निर्यात कमी झालेली नाही. GDP च्या तुलनेत पुढील प्रमाणे निर्यात झालेली दिसून येते.

**तक्ता क्र. 7: भारताची निर्यात**

| वर्ष | भारताची निर्यात GDP च्या प्रमाणात (%) |
|---|---|
| 2010 | 22.40 |
| 2011 | 24.54 |
| 2012 | 24.53 |
| 2013 | 25.43 |
| 2014 | 22.97 |
| 2015 | 19.81 |
| 2016 | 19.16 |
| 2017 | 18.79 |
| 2018 | 19.93 |
| 2019 | 18.66 |
| 2020 | 18.68 |

संदर्भ – World Bank

सन 2010 ते सन 2020 या काळात निर्यात घटत जात आहे. सन 2010 ला 22.40% निर्यात होती, ती सन 2020 ला 19.68% झालेली आहे. सन 2010 ते सन 2020 या काळात सरासरी 19.53% निर्यात GDP च्या प्रमाणात होती.

**निष्कर्ष:**

सन 2010 ते सन 2020 या काळात चलनवाढ सातत्याने कमी झालेली आहे. फक्त सन 2020 मध्ये ती वाढलेली आहे. त्यामुळे रोजगार, GDP, औद्योगिक विकास, आयात, निर्यात इ. घट झालेली आहे, परंतु बेकारी देखील कमी झालेली आहे.

**संदर्भ**:

1) Datta & Sundharam (2023) Indian Economy.
2) Agricultural Statistics at a Glance.
3) World Bank website.
4) Global Data
5) Dea.gov.in
6) Indian Journal of Finance.
7) Economics & Political Weekly.